# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**आपले सरकार सेवा केंद्र बाबत अटी व शर्ती ः-**

1. आपले सरकार सेवा केंद्र साठी अर्ज हा जिल्हा सेतु समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे करावा.
2. अर्ज करणारा नागरिक हा त्या गावचाच रहिवासी असावा. जर त्या गावासाठी अर्ज आला नसेल तर जवळच्या गावाचा विचार करण्यात येईल.
3. नगरपरिषद /नगरपंचायत भागात संबधीत तहसिलदार हे प्रभागनिहाय केंद्र निश्चित करुन देतील व आपले सरकार सेवा केंद्र चालकांना ते मान्य राहील.
4. नागरिक फक्त एकच आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करु शकतात.त्याचे कुटुंबातून दुसरा अर्ज असल्यास तो ग्राहृय धरण्यात येणार नाही.
5. ज्या कुटुंबामध्ये आपले सरकार सेवा केंद्र सुरवातीपासूनच असेल त्यांचा अर्ज ग्राहृय धरण्यात येणार नाही.
6. अर्जामध्ये जर माहिती चुकीची असेल तर त्याच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही तसेच त्याच्यावर कायदेशीर कार्यवाहीसुध्दा करणेत येईल.
7. आपले सरकार सेवा केंद्र यांना शासनाचे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यांचे वेळोवेळी येणारे आदेश मान्य करावे लागतील.
8. आपले सरकार सेवा केंद्र ज्या ठिकाणी देणेत येईल त्याच ठिकाणी ते कार्यरत असणे आवश्यक राहील. आपले सरकार सेवा केंद्राची जागा बदललेस संबधीत आपले सरकार सेवा केंद्र बंद करणेत येईल.
9. शासन निर्णय दिनांक 19 जानेवारी 2018 नुसार सर्व अटी व शर्ती मान्य राहतील.
10. शासनाव्दारे दिलेल्या सर्व सेवा आपले सरकार सेवा केंद्रातून देणे अनिवार्य राहील.
11. शासन निर्णय 19 जानेवारी 2018 नुसार आपले सरकार सेवा केंद्राचे बॅनर (परिशिष्ट ड), तसेच केंद्रामार्फत देणेत येणा-या सेवा (परिशिष्ट क), दर्शनी भागात सेवानिहाय रेट चार्ट लावणे आवश्यक राहिल. तसेच नागरिकांसाठी बसण्याची सोय व आवश्यक तथा सर्व बाबीची परिपूर्तता करावी लागेल.
12. उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशाचे वेळोवेळी पालन करावे लागेल.
13. सर्व प्रकारचे डिजिटल पेमेंटला प्राधान्य दयावे लागेल.
14. शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार आपले सरकार सेवा केंद्र सुरु ठेवावे लागेल.
15. शासनाचे सर्व साहित्य याचे काटकसरीने वापर संरक्षण व जतन करणे.
16. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी नियुक्त केलेला तांत्रिक अधिकारी हे आपले सरकार सेवा केंद्र ची संपूर्ण चौकशी करु शकतील.
17. नागरिकांची तक्रार आल्यास आपले सरकार सेवा केंद्राची चौकशी करुन त्यावर कारवाई करणेत येईल.
18. आपले सरकार सेवा केंद्राकरीता कोणताही शासकीय परिसरामध्ये जागा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.
19. आपले सरकार सेवा केंद्र मंजुरीबाबतचा अंतीम अधिकार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, अहमदनगर यांचेकडेस राखून ठेवलेला आहे.

**उपजिल्हाधिकारी महसूल**
**तथा सदस्य सचिव, जिल्हा सेतु समिती,**
**अहमदनगर**